# महाविद्यालय विकास समिती अहवाल २०२३-२४

सार्वजनिक विद्यापीठ अधिनीयम २०१६ मधील कलम ९७ अन्वये महाविद्यालय विकास समिती महाविद्यालयात गठीत करण्यात आली आहे. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालय विकास समितीच्या पार पडलेल्या बैठकीत झालेल्या कामकाजाचा आढाव पुढील प्रमाणे.

- महाविद्यालय विकास समितीची पहिली सभा बुधवार दि. १४ जून २०२३ रोजी पार पडली.

- पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या मागील दिनांक ०५/०१/२०२३ सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
- महाविद्यालयाला स्वायत्तता प्राप्त झाल्यानंतरच्या चौथ्या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सभेसमोर सादर करण्यात आला. महाविद्यालयात सुरू करण्यात आलेले नविन अभ्यासक्रम, महाविद्यालयाची कामगीरी यावर सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले व सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचे अभिनंदन करण्यात आले.
- आर्थिक वर्ष २०२३-२४ चे अनुदानित व विनाअनुदानित विभागाच्या अंदाजपत्रकांना सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.
- दि.०१/०१/२०२३ ते ०७/०६/२०२३ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा-यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.
- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ चा अंतर्गत गुणवत्ता हमी समितीचा अहवाल आणि सन २०२३-२४ चे शैक्षणिक कॅलेंडर सभेसमोर सादर करण्यात आले, त्याला सभेने मंजुरी दिली.
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी महाविद्यालयातील पदवी व पद्व्युत्तर विभागातील विनाअनुदानित तत्वावर कार्यरत असणाऱ्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांची कार्यभारानुसार नियुक्ती व वेतन निश्चिती करणे याबाबत चर्चा करण्यात आली. महाविद्यालयात रिक्त असलेल्या ०७ अनुदानित पदांवर तासिका तत्वावर नियुक्ती करण्यासाठी मा.सहसंचालक उच्च शिक्षण, पनवेल यांच्याकडुन नाहरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्याचे सभेला सांगण्यात आले सदर ना हरकत प्रमाणपत्राला अनुसरून विहित पद्धतीचा

अवलंब करून सदर पदांपैकी रसायनशास्त्र, इंग्रजी, अर्थशास्त्र, भूगोल व वाणिज्य या विषयांकरिता तासिका तत्वावर शिक्षकांची नियुक्ती करण्यात आल्याचे सभेला सांगण्यात आले.

- ➢ शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी विनाअनुदानित अभ्यासक्रमांसाठी विद्यापीठाने विहित केलेल्या कार्यभारानुसार आवश्यक शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली असल्याचे सभेला सांगण्यात आले
- ➢ स्वायत्त महाविद्यालयाच्या दि.२५ मार्च २०२३ रोजीच्या विषय क्र.०३ व ठराव क्र.०३ नूसार महाविद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून एम.कॉम. बँकींग ॲन्ड फायनान्स हा अभ्यासक्रम सुरू करण्यात येणार असल्याचे सभेला सांगण्यात आले. महाविद्यालयातून दर वर्षी ८० ते ९० विद्यार्थी हे कॉमर्स या शाखेतून पदवी प्राप्त करून बाहेर पडतात व तेवढेच विद्यार्थी आसपासच्या महाविद्यालयातून पदवी प्राप्त करून बाहेर पडत असल्याचे सभेला सांगण्यात आले. महाविद्यालायात सुरू असलेल्या बी.व्होॅक. बँकीग ॲन्ड फायनान्स या अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना देखील या पद्व्यत्तर अभ्यासक्रमाला प्रवेश घेता येईल असे सांगण्यात आले. सर्व उपस्थितांनी याबद्दल आनंद व्यक्त केला.
- ➢ महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. तेंडोलकर यांनी मागील शैक्षणिक वर्षाप्रमाणेच यावर्षी शुल्क आकारण्यात येणार असल्याचे सभेला सांगितले. महाविद्यालयाच्या वार्षिक अंकाच्या छपाई करिता होणारा खर्च हा विद्यार्थ्यांनकडून घेण्यात येणाऱ्या शुल्कापेक्षा जास्त असल्यामुळे या शैक्षणिक वर्षापासून मॅगझीन शुल्काकरवी आकारण्यात येणाऱ्या शुल्कामध्ये रू.८०/- ची वाढ करण्यात आल्याचे सभेला सांगण्यात. तसेच या शैक्षणिक वर्षापासून सुरू करण्यात येणाऱ्या एम.कॉम. बँकींग ॲन्ड फायनान्स या अभ्यासक्रमाकरिता आकारण्यात येणारे शुल्क सभेसमोर सादर करण्यात आले व त्याला मंजूरी देण्यात आली.

- ● महाविद्यालय विकास समितीची दुसरी सभा शुक्रवार दि. १५ सप्टेंबर २०२३ रोजी पार पडली

- ➢ पदवी महाविद्यालय स्थानिक व्यवस्थापन समितीच्या मागील दिनांक १४/०६/२०२३ सभेतील कामकाजाची माहिती सभेसमोर सादर करण्यात आली व इतिवृत्तास मंजुरी देण्यात आली.
- ➢ दि.०८/०६/२०२३ ते ३१/०८/२०२३ या कालावधीत महाविद्यालयीन कर्मचा-यांनी उपभोगिलेल्या रजांचा तपशील सभेसमोर सादर करण्यात आला. सर्व रजा नियमानूसार योग्य असल्याने रजांना सर्वानूमते मंजूरी देण्यात आली.
- ➢ शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये पार पडलेल्या तृतीय वर्ष कला, वाणिज्य व विज्ञान वर्गांच्या तसेच एम.ए. एम.एस्सी. भाग २ परीक्षेचा निकाल प्राचार्यांनी सभेसमोर तपशिलवार सादर केला. महाविद्यालयाचा पदवी विभागातील कला शाखेचा निकाल ७८.५७ % , वाणिज्य शाखेचा निकाल

८०.३६% तर विज्ञान शाखेचा निकाल ८५.७१ % जाहीर झाला आहे तर पदव्युत्तर विभागातील एम.एस्सी. चा निकाल ७२.६२ व एम.ए.चा निकाल ६६.६७ % जाहिर झाला आहे असे सभेला सांगण्यात आले. तसेच सर्व यशस्वी विद्यार्थी व मार्गदर्शक शिक्षकांचे अभिनंदन करण्यात आले.

- मा.प्राचार्य डॉ.तेंडोलकर यांनी माहिती दिली की, युजीसी, राज्य सरकार आणि मुंबई विद्यापीठाच्या शिफारशींनुसार, महाविद्यालयाने जून २०२३ पासून NEP २०२० यशस्वीरित्या लागू केले आहे. त्यांनी सांगितले की महाविद्यालयाच्या विविध विषयांच्या अभ्यासमंडळांनी सर्व अभ्यासक्रम NEP २०२० नुसार तयार केला आहे. NEP २०२० नुसार मुख्य आणि उप विषयांच्या अभ्यासक्रमा बरोबर अन्य घटक विचारात घेऊन General (Open Elective), VSEC. AEC, VEC, IKS तयार करण्यात आले आहेत. प्रथम वर्षाचे अभ्यासक्रम एनईपी २०२० प्रमाणे महाविद्यालयात सुरू करण्यात आलेले आहेत. यावर सर्व उपस्थितांनी समाधान व्यक्त केले.
- आर्थिक वर्ष २०२२-२३ च्या अनुदानित व विनाअनुदानित विभागांचे सनदी लेखापालांनी प्रमाणित केलेले जमा-खर्च पत्रक व ताळेबंद सभेसमोर सादर करण्यात आला व त्याला सर्वांनूमते मंजूरी देण्यात आली.
- महाविद्यालयात कार्यरत असणाऱ्या ०३ शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सध्याच्या पदावर सेवेची ०३ वर्षे पुर्ण केली असल्यामुळे सदर कर्मचारी पदोन्नतीस पात्र असल्याचे सभेला सांगण्यात आले. सदर कर्मचाऱ्यांची काम समाधानकारक असल्यामुळे त्यांना पदोन्नती देण्यात यावी व नाहरकत प्रमाणपत्र मिळणेचा प्रस्ताव संबधीत कार्यालयाकडे सादर करण्यात यावा असे ठरविण्यात आले
- शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मध्ये महाविद्यालयातील विनाअनुदानित तत्वावर कार्यरत शिक्षकेतर कर्मचारी यांची राष्ट्रीय निवृत्ती योजनेत खाती काढणे बाबत चर्चा करण्यात आली व ज्या कर्मचाऱ्यांना संस्थेच्या सेवेत ०३ वर्षे पुर्ण झाली आहेत त्या कर्मचाऱ्याची राष्ट्रीय निवृत्ती योजनेत खाती उघडण्यात यावी असे ठरविण्यात आले.

NYA. ATHALYE, VED. SAPRE, VID. PITRE COLLEGE DEVRUKH

प्राचार्य